# महावितरणच्या वीजग्राहकांसाठी वीजमीटरची राज्यात पुरेशा प्रमाणात उपलब्धता

मुंबई, दि. 01 सप्टेंबर 2018 :-

महावितरणच्या राज्यभरातील वीज ग्राहकांसाठी नवे वीजमीटर पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून कुठेही मीटरचा तुटवडा नाही. तसेच वीज मीटरचा तुटवडा जाणवू नये म्हणून महावितरणने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत.

मागील काही महिन्यांत केंद्र शासन पुरस्कृत सौभाग्य योजना तसेच दिनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या. तसेच संपूर्ण राज्यात जुनी इलेक्ट्रो-मेकॅनीकल मीटर व नादुरुस्त मीटर बदलविण्याची मोहीम राबविण्यात आली. त्यामुळे काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणात मीटरचा तुटवडा जाणवला होता. परंतु आता राज्यात कुठेही मीटरचा तुटवडा नाही.

महावितरणच्या विविध कार्यालयांत सिंगल फेजचे सध्या सुमारे 2 लाख 31 हजार तर थ्रीफेजचे सुमारे 1 लाख 63 हजार नवीन मीटर उपलब्ध आहेत. याशिवाय महावितरणने 30 लाख नवीन सिंगलफेज वीजमीटरची खरेदी केली असून पहिल्या टप्प्यात त्यातील 89 हजार नवीन मीटर ऑगस्ट महिन्यात विविध कार्यालयांत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सप्टेंबर महिन्यात सुमारे 2 लाख 60 हजार मीटर्स उपलब्ध होणार आहेत. त्यानंतर पुढील प्रत्येक महिन्यात सुमारे 3 लाख 80 हजार नवीन वीजमीटर ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. 2019 च्या मे महिन्यापर्यन्त हे 30 लाख मीटर महावितरणला मिळणार आहेत.

भविष्यात महावितरणच्या वीजग्राहकांना नवीन मीटरची टंचाई जाणवू नये म्हणून आणखी 20 लाख मीटर नव्याने घेण्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. सर्व वर्गवारीतील वीजग्राहकांना महावितरणकडे असलेली मीटर्सची उपलब्धता महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे.

दूरध्वनी क्र. 26474211,

विस्तार क्र. 3617.

उपमुख्य जनसंपर्क अधिकारी

MSEDCL

# Mahavitaran Has Adequate Meters For Its Consumers in State

Mumbai, 01 September, 2018:

Mahavitaran has adequate meters to fulfill the requirements of its consumers in the State. It has already made provision for fulfilling the future requirements by starting the process of buying new meters.

In the last few months, numerous electricity connections are released under the Central government awarded- Saubhagya Yojna and Deen Dayal Upadhyay Gram Jyoti Yojna. Also, a drive to change the old electro-mechanical meters and faulty meters was carried out. Therefore, there was a gap in supplying the required amount of meters in very few places. Today, there is no such unavailability.

Currently, there are around 2 Lakh 31 Thousand Single Phase and around 1 Lakh 63 Thousand Three Phase new meters available in the various office of Mahavitaran. Apart from this, Mahavitaran has bought new 30 Lakh single phase meters. Of which 89 Thousand meters were made available in the various offices of Mahavitaran in the first phase in the month of August. Around 2 Lakhs 60 Thousand meter will be available in September. From now onwards, certain amount of meters will be given to consumers in a phase-wise manner every month. Mahavitaran will get these 30 Lakh meters by May 2019.

Mahavitaran has already begun the tendering process to buy more 20 Lakh new meters so that the consumers should not feel the shortage of meters in future. The consumers of Mahavitaran from all the categories can check the availability of meters on www.mahadiscom.in.

**Telephone No.** 26474211
**Extn.** 3525

**Public Relations Officer.**

MSEDCL